RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १०, अंक ६३(४)] बुधवार, ऑक्टोबर ९, २०२४/आश्विन १७, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ११८

**प्राधिकृत प्रकाशन**

**विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांजकडून**

**अनुसूची-V**

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत ) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिध्द करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

**अधिसूचना**

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-१०३/ई-२४८९७९५/CR-७००/२०२४.—महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत ) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समूह, वस्ती/वस्त्यांचा समूह, वाडी/वाड्यांचा समूह गाव म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येते;

आणि ज्याअर्थी, **जव्हार** तालुक्यातील **घिवंडा** ग्रामपंचायतीतील **पिंपळपाडा** पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह / वस्त्यांचा समूह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत ) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक **२९/११/२०२२** रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, **सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार, विभाग जव्हार** यांनी यासंदर्भात दिनांक **२५/०४/२०२३** रोजी **घिवंडा** ग्रामपंचायतीत येणाऱ्या **पिंपळपाडा** पाडा/वस्ती/पाड्याचा समूह/वस्त्यांचा समूह यांची संबंधीत नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे;

आणि ज्याअर्थी, **जिल्हाधिकारी, पालघर** यांनी चौकशीअंती संबंधित पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह/ वस्त्यांचा समूह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे;

आणि त्याअर्थी, मी, **विकास पानसरे, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **जव्हार** तालुक्यातील **घिवंडा** ग्रामपंचायतीतील **पिंपळपाडा** येथे पाडा/वस्ती/ पाड्यांचा समूह/ वस्त्यांचा समूह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपरिक हद्द खालीलप्रमाणे आहेः—

| अ.क्र. | हद्दीचे तपशील | समूह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा ( आवश्यक असल्यास ) |
|---|---|---|---|
| १. | पूर्वेस | - | देविचामाळ,बेझोतेचामाळ |
| २. | पश्चिमेस | - | शिवेचामाळ |
| ३. | दक्षिणेस | - | इवार माधावेध्याचामाळ, एकमाऊली |
| ४. | उत्तरेस | - | नागडोंगर गडगेचामाळ |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळून उरलेले क्षेत्र मूळ गाव म्हणून ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई.
दिनांक १ ऑक्टोबर २०२४.

**विकास पानसरे,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.